दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (कर)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/०१२/२०१९
दि.१६/०२/२०१९.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (कर), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.**

श्री.राजीव त्रिंबक देशपांडे, ...............अपिलार्थी
बी-१५, नूतन निवास, वीर सावरकर नगर,
वसई रोड, वसई (प.) ४०१२०२.

जनमाहिती अधिकारी तथा, ...............प्रतिवाद
उप-कर निर्धारक व संकलक (कर)

## -: विवेचन :-

श्री.राजीव त्रिंबक देशपांडे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा उप-कर निर्धारक व संकलक (कर) यांचेकडे दि.१४/०१/२०१९ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

**विषय:- मालमत्ता क्र.एच०१००११२४७००१ ते एच०१००११२४७०१९ (ओसवाल ऑर्नेट) बाबत.**

अ) वरील विषयांकीत सर्व मालमत्ता क्रमांकांच्या मालमत्ता कर आकारणीसाठी महापालिका कार्यालयास प्राप्त मागणी अर्जाच्या सर्व दस्तऐवजांच्या (पडताळणी) सर्च देवून पसंतीनुरुप साक्षांकीत प्रती पुरविणे.

ब) वरील विषयांकीत सर्व मालमत्ता क्रमांकाच्या मालमत्ता आकारणी (ॲसेसमेंट) पत्रांसह देयकांच्या साक्षांकीत प्रती पुरविणे.

क) वरील विषयांकीत सर्व मालमत्तांना कर आकारणी करणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या कार्यरत विभागासह त्यांची नावे, पदनाम, कर्तव्ये, जबाबदाऱ्यांची साक्षांकीत माहिती पुरविणे.

ड) वरील विषयांकीत मालमत्तांच्या कर आकारणीसाठी दाखल मागणी पत्रांसह केलेल्या कारवाईबाबतच्या पालिका आवक-जावक रजिस्टरमधील नोंदीच्या साक्षांकीत प्रती पुरविणे.

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**

माहिती अधिकार अंतर्गत मुद्दा क्र.अ,क,ड नुसार माहिती पुरविली नाही तसेच मुद्दा क्र.ब नुसार पारित माहिती साक्षांकीत केली नाही.

**सुनावणीचा तपशिल:-**

अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा उप-कर निर्धारक व संकलक (कर)/सहा.जनमाहिती अधिकारी तथा कर निरिक्षक, प्रभाग क्र.३ यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.१५/०२/२०१९ रोजी दुपारी ०१.०० वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.कर/०१५/२०१९ दि.१२/०२/२०१९ अन्वये कळविण्यात आले होते.

परंतु सदर दिवशी स्थायी समिती सभा आयोजित केली असल्याने सुनावणी रद्द करण्यात आली असुन प्रथम अपिलाची सुनावणी, मा.प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (कर) यांचेसमोर दि.१६/०२/२०१९ रोजी दुपारी ०१.०० वाजता आयोजित करण्यात आली असुन सुनावणीस उपस्थित राहणेबाबत अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा उप-कर निर्धारक व संकलक (कर) यांना जा.क्र.मिभामनपा/उपआ.कर/१८/२०१९ दि.१४/०२/२०१९ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा उप-कर निर्धारक व संकलक (कर)/ सहा.जनमाहिती अधिकारी तथा कर निरिक्षक, प्रभाग क्र.३ व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

१) **अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद**:- माहिती अधिकार अंतर्गत मुद्दा क्र.अ,क,ड नुसार माहिती पुरविली नाही तसेच मुद्दा क्र.ब नुसार पारित माहिती साक्षांकीत केली नाही.

२) **जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-** अपिलार्थी अर्जदार यांना माहिती देण्यात आलेली आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

## -: निर्णय :-

१) जनमाहिती अधिकारी तथा उप-कर निर्धारक व संकलक/ सहा.जनमाहिती अधिकारी तथा कर निरिक्षक, प्रभाग क्र.३ यांनी अभिलेखाचा शोध घेऊन अपिलार्थी अर्जदारास १० दिवसांत सुधारित माहिती विनाशुल्क स्वरुपात देण्यात यावी. वरील निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात येत आहे.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उपायुक्त (कर)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

18-2-2019

**प्रति:-**

१) श्री.राजीव त्रिंबक देशपांडे,
बी-१५, नूतन निवास, वीर सावरकर नगर,
वसई रोड, वसई (प.) ४०१२०२.

२) जन माहिती अधिकारी तथा उप-कर निर्धारक व संकलक (कर)

३) सहा.जन माहिती अधिकारी तथा कर निरिक्षक, प्रभाग क्र.३

४) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (कर) यांचे कार्यालय.

पोच 18/2/201
कर विभाग
मिरा-भाईंदर म...